**राज्य सांस्कृतिक धोरण, २०१०**
**"मराठी व्युत्पत्ती कोश" या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता व खर्चास मंजूरी देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : रासांधो १०११/ प्र.क्र.३४/ २०११/भाषा - ३
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक - १६.११.२०११

**शासन निर्णय :-** "समाजातील ज्या घटकांच्या बोली दुर्लक्षित होत्या अशा घटकांच्या बोलींमधील शब्दांच्या व्युत्पत्ती देणारा एक अद्ययावत असा मराठी शब्द "व्युत्पत्ती कोश" तयार करणे ही काळाजी गरज आहे. सदर कोश प्रसिध्द करण्यासाठी येणा-या रुपये १२,००,०००/- (रुपये बारा लक्ष फक्त) इतक्या खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. विचाराअंती या शासन निर्णयान्वये " व्युत्पत्ती कोश " या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता व या कोशाच्या मुद्रणासाठी होणाऱ्या एकूण रु.१२,००,०००/- (एकूण रुपये बारा लक्ष फक्त) इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सद्य:स्थितीत काम सुरु करण्याच्या दृष्टीने प्रथमत: रु.१२.०० लक्ष अनुदानापैकी रु.२.०० (रुपये दोन लक्ष) इतक्या रकमेस सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात खर्च करणेस शासन मान्यता देण्यात येत असून यापुढे सदर प्रकल्प पूर्ण होईपर्यंत त्या त्या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पात तरतूद करुन घेण्याची दक्षता महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून घेण्यात यावी.

४. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. सदर प्रकल्पासाठीचा या वित्तीय वर्षातील रुपये २,००,०००/- इतका होणारा खर्च, "मागणी क्र.झेड एफ०२, २२०५ - कला व संस्कृती (००)१०२, कला व संस्कृती प्रचालन, ०१ योजनांतर्गत योजना (०१)(०१) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) - ३१ सहायक अनुदाने (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षाखाली प्रत्येक वित्तीय वर्षात उपलब्ध करून दिलेल्या मंजूर आर्थिक तरतूदीतून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद-२७ (२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

( संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६३२४८८(३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( कि.रा.कुलकर्णी )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
७. वित्त विभाग, (व्यय - ४ / सेवा ५ / विनियम), मंत्रालय, मुंबई,
८. सचिव / उप सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय यांचे स्वीय सहायक,
९. निवड नस्ती (भाषा-३).